RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक १०(२)] गुरुवार, जानेवारी १८, २०२४/पौष २८, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ११**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जानेवारी, २०२४.

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.८२/अ-४.—ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ( २०१३ चा ३० ) महाराष्ट्र राज्याला लागू असतांना, (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम १० क मध्ये, अशी तरतूद आहे की, राज्य शासनास लोकहितास्तव **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे उक्त कलम १०क मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रकल्पांना, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन आणि प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येईल ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनास असे दिसून आले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये नमूद केलेल्या जमिनी उक्त कलम १० क च्या खंड ( च ) च्या व्याप्तीत येणाऱ्या आणि यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये नमूद केलेल्या प्रकल्पासाठी ( यात यापुढे ज्याचा, निर्देश "उक्त प्रकल्प" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहेत किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने उक्त प्रकल्पांकरिता केवळ किमान निव्वळ जमिनीची आवश्यकता भासेल हे लक्षात घेऊन प्रस्तावित संपादनासाठीच उक्त जमिनीचे व्याप्तिक्षेत्र निश्चित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास याद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम १० क खालील उक्त प्रकल्पाला उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन आणि प्रकरण तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून लोकहितास्तव सूट देणे इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम १० क द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत, त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे लोकहितास्तव, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देत आहे.

**अनुसूची एक**
**जमिनींचा तपशिल**

मौजे वाकी तर्फे वाडा तालुका खेड, जिल्हा पुणे

| अ.क्र. | गट नंबर | संपादित करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | २८ पैकी | २००० |
| | **एकूण** | **२०००** |

**अनुसूची दोन**
**प्रकल्पाचा तपशील**

| | |
|---|---|
| **प्रकल्पाचे नाव** | मौजे वाकी तर्फे वाडा, ता. खेड, जि. पुणे येथील भामा आसखेड येथील धरणाजवळ अप्रौच ब्रिजचे बांधकाम करणे. |
| **प्रकल्पाचा तपशील** | मौजे वाकी तर्फे वाडा, ता. खेड, जि. पुणे येथील गट नं. २८ पैकी येथे भामा आसखेड धरणाजवळ अप्रौच ब्रिज व इतर अनुषंगिक बांधकाम करणे. |
| **संपादन अभिकरणाचा तपशील** | आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुनिल कोठेकर,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 18th January, 2024.

*NOTIFICATION*

Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013.

No. Sankirn -2023/C.R.- 82/A-3.—Whereas, section 10A of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), in its application to the State of Maharashtra (hereinafter referred to as "the said Act"), provides that the State Government may, in the public interest, by notification in the *Official Gazette*, exempt any of the projects mentioned in the said section 10A from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act ;

And whereas, it appears to the State Government that the lands mentioned in Schedule I appended hereto are required or likely to be required for the project mentioned in Schedule II appended hereto, which is covered under clause (*f*) of the said section 10A (hereinafter referred to as "the said project") ;

And whereas, the State Government has ensured the extent of the said lands for the proposed acquisition being bare minimum land required for the said project ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient in the public interest to exempt the said project under section 10A of the said Act from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 10A of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, in the public interest exempts the said project from the application of the provisions of Chapter II and Chapter III of the said Act.

*Schedule-I*

**Description of Lands**

Village Waki tarfe Wada, Taluka Khed, District Pune

| Sr. No. | Gut No. | Area as per Land Acquisition Proposal (Sq. Mtrs.) |
|---|---|---|
| 1 | 28 | 2000 |
| | **TOTAL** | **2000** |

*Schedule-II*

**Description of Project**

| | |
|---|---|
| *Name of the Project* | Waki tarfe wada, Taluka-Khed, District-Pune Aproch Bridge near Bhama Askhed Dam. |
| *Description of Project* | Aproch Bridge and other activities near Bhama Askhed Dam situated at Gut No.28 of Village Waki tarfe Wada, Taluka Khed, District Pune. |
| *Details of Acquiring Agency* | Municipal Commissioner, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri, Pune. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUNIL KOTHEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.